International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.3 Jan – Feb 2023

# संविधान व मूलभूत कर्तव्य

**प्रा.डॉ. अविनाश पांचाळ**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र शारदा महाविद्यालय कला व विज्ञान, परभणी
*Corresponding Author*- प्रा.डॉ. अविनाश पांचाळ
Email- avinashpanchal9@gmail.com
DOI - 10.5281/zenodo.7727073

भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण होऊन गेली आहेत. परंतु भारतीय संविधान व मूलभूत कर्तव्य याची जाणीव समाजातील किती लोकांपर्यंत रुजली आहे? यावरून देशाचे भवितव्य ठरत असते. बहुसंख्य लोकांना संविधानच माहीत नसल्यामुळे हक्क व कर्तव्ये याबाबत ते उदासीन असतात. म्हणून संविधानाची जागृती जनतेत निर्माण करण्यासाठी संविधान दिनाच्या वेळी व्यक्तीच्या हक्कांसोबतच कर्तव्याची चर्चा होणे फार महत्त्वाचे असते.

स्वातंत्र्यानंतरचा भारत कसा असेल याचे चित्र भारतीय संविधान निर्माणकर्त्यांनी समाजासमोर स्पष्टपणे नमूद केले आहे. संविधान निर्मात्यांनी अतिशय कष्टाने देश घडविण्यासाठी निर्माण केलेले भारतीय संविधानाचे पावित्र्य जपणे हा प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे. संविधानाच्या प्रास्ताविकेत असे नमूद केले आहे की, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, राष्ट्रीय एकता व एकात्मता, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, लोकशाही, गणराज्य प्रस्थायी करायचे आहे. संविधानाचा हा निश्चय व निर्धार नागरिकांनी स्वच्छ मनाने पार पाडल्याशिवाय पूर्णत्वास येऊ शकत नाही. हक्क आहेत तर सोबतच कर्तव्येही आहेत. हक्क आणि कर्तव्य एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. देशातील प्रत्येक नागरिकांनी हक्काबाबत जागरूक राहुन कर्तव्यपालनाची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. संविधान सभेत भाषण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, ‘घटना कितीही चांगली असली तरी ती अमलात आणणारे लोक जर चांगले नसतील तर त्या घटनेचे मातेरे होते. मात्र घटना कितीही वाईट असली तरी ती राबविणारे लोक चांगले असतील तर ती घटना निःसंशय चांगली ठरते.’ तसेच संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद म्हणाले की, ‘राज्यघटनेत काही असेल अथवा नसेल, राज्यघटना काही सांगो अथवा न सांगो, देशाचे कल्याण या देशाचे शासन-प्रशासन कोणत्या प्रकारे केले जाते यावर अवलंबून राहील आणि शाळा-प्रशासन चालविणारे लोक कोण वा कसे आहेत त्यावर अधिक अवलंबून राहील.’ यामुळे प्रत्येकांनी संविधान व मूलभूत कर्तव्याचे पालन करणे प्रासंगिक आहे.

**मूलभूत कर्तव्ये:**

सन १९७६ साली संविधानाच्या दुरुस्तीद्वारे घटनेत ४२ वी दुरुस्ती करून नागरिकांच्या मूलभूत कर्तव्याची नोंद घटनेत करण्यात आली. ही मूलभूत कर्तव्य घटनेच्या चौथ्या प्रकरणात कलम ५१-अ मध्ये समाविष्ट करण्यात आली.

संविधानाच्या दुरुस्तीद्वारे कलम ५१-अ द्वारा, नागरिकांची मूलभूत कर्तव्ये विशद करणारा भाग संविधानात समाविष्ट करून ही दुरुस्ती ३ जानेवारी १९७७ पासून अमलात आली. संविधानात ४२व्या सुधारणा अधिनियमाद्वारे मूळ उद्देशिकेतही, समाजवादी व सेक्युलर हे शब्द सामील करण्यात आले. त्या अधिनियमांत 'समाजवादी व सेक्युलर' या शब्दांची व्याख्याही प्रस्तावित करण्यात आली होती. ज्यांत 'समाजवादी म्हणजे सामाजिक, राजकीय आणि आथिर्क शोषणापासून सर्वार्थाने मुक्ती' तर 'सेक्युलर' म्हणजे 'सर्व धर्मांबद्दल समान आदर' असा अर्थ घेण्यात आला.

भारताची संविधान तयार करताना अशा कर्तव्याचा समावेश घटनेत करण्यात आला नव्हता. भारतीय समाजाला स्वातंत्र्य आणि अधिकार हेच सर्वस्व मानावे लागले होते. कर्तव्ये कुठली असतील याचा उल्लेख नव्हता. परिणामी जबाबदाऱ्या पूर्ण करण्यात नागरिकांची कुचंबना होत होती. राष्ट्रगीत म्हणायला कोणी विरोध करायचे तर कोणी झेंडावंदनला विरोध करायचे. यामुळे स्वातंत्र्यलढ्यातील उद्दात हेतू लोक विसरून बंधुभाव कमी होऊ लागला. सर्वत्र जाळपोळ, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान, संघर्ष, भांडणे, विघटनवाद उफाळून येत होता. याचे कारण आपल्या नेत्यांची अशी भावना होती की, कर्तव्यांचा उल्लेख करण्याची गरज नाही; कारण अधिकार व हक्क यांचा जन्मच कर्तव्यांच्या कुशीतून होतो. एवढेच नव्हे तर कर्तव्यांचे पालन करता यावे म्हणून अधिकार व हक्क दिले जातात. पण हक्कांशी कर्तव्य जोडले गेले नसेल, तर त्या हक्काची परिणती हुकूमशाही वृत्ती व बेजबाबदारपणा यात होत असते. त्यामुळे सत्तेचा गैरवापर होऊन भ्रष्टाचाराचा जन्म होतो, अराजकता फोफावत असते. तेव्हा नागरिकांच्या

कर्तव्यांचा भाग संविधानांत जोडला गेल्यामुळे माझ्या मते संविधानाचा प्राण आहे. नागरिकांची मूलभूत कर्तव्ये कोणती आहेत याचा थोडा आढावा घेतला पाहिजे.

1. देशाचे संविधान, संविधानाने निर्माण केलेल्या संस्था, राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीत यांचा आदर प्रत्येक नागरिकाने करावा. हे कर्तव्य सर्व धर्मीयांकडून अपेक्षित आहे. अलिकडच्या काळात काही धर्मवादी संघटना व राजकीय पक्ष या संदर्भात अनाठायी भूमिका घेताना दिसतात.

2. भारताचे सार्वभौमत्व, एकता व एकात्मता जोपासणे व त्यांचे संरक्षण करणे.

3. स्वातंत्र्यलढ्यातील उद्दात तत्त्वांचे पालन करणे. गरज पडेल तेव्हा देशाच्या संरक्षणासाठी आवश्यक सेवा प्रत्येकांनी द्यावी.

4. सर्व नागरिकांत बंधुभाव वाढवने व महिलांच्या प्रतिष्ठेआड येणाऱ्या प्रथेचा निषेध करणे. धार्मिक, भाषिक, प्रादेशिक किंवा सांप्रदायिक विविधतेमुळे भेदभाव करू नये. आशा भेदभावामुळे नागरिकांमध्ये देशप्रेम, राष्ट्रभक्ती कमी होत असते. शेजारील देश पाकिस्तान व चीन हे आपल्या समोर पुन्हा आव्हाने व अडचणी निर्माण करत आहेत. म्हणून देशाच्या संरक्षणासाठी नागरिकांनी समर्पणाची भावना दाखवणे काळाची गरज आहे.

5. भारताच्या विविधतेने नटलेल्या संस्कृतीचा समृद्ध वारसा जपून तो जतन करावा. नाहीतर काही धर्मवादी संघटना व पक्ष आपल्या संकुचित स्वार्थासाठी समाजात धार्मिक ध्रुवीकरणाचे राजकारण करून दरी निर्माण करताना दिसत आहेत. म्हणून नागरिकांनी विवेकवादी विचार बाळगून या संदर्भात आपले कर्तव्य पार पाडल्यास देशाची एकता आणि एकात्मता टिकवून ठेवता येईल.

6. जंगले, जलाशये, नद्या, वन्य प्राणी यांचे संरक्षण करावे. सर्व प्राणिमात्रांची काळजी घेऊन प्राणिमात्रांबद्दल दयाबुद्धी बाळगावी. पर्यावरणाचे रक्षण करणे ही मानवी समाजाची मूलभूत गरज आहे.

7. प्रत्येकाने विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन बाळगून मानवतावादी, चौकस व सुधारणावादी प्रवृत्तीचा विकास करणे.

8. सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे. आज विविध पक्षाच्या माध्यमातून सत्ताधारी पक्षाचा विरोध दर्शवित असताना सार्वजनिक मालमत्तेचे अफाट नुकसान होताना दिसते आहे. तर दुसरीकडे शासनही आपल्या कर्तव्यांपासून दूर कसे जात आहे याची अनेक उदाहरणे प्रसारमाध्यमांतून नजरेत पडताना दिसतात. अशा भयावह परिस्थितीत सुजाण नागरिकांनी या संदर्भात आपले कर्तव्य निभावले तर भारतीय समाजापुढील मोठा धोका दूर होईल असे वाटते.

9. वेगवेगळ्या क्षेत्रांत राष्ट्राची प्रगती व्हावी यासाठी वैयक्तिक आणि सांघिक कार्यात कुशलता संपादन करण्यासाठी प्रयत्न करणे. व्यक्तीची प्रगती ही समाजाची प्रगती असते पर्यायाने त्याचा उपयोग राष्ट्रविकासात होत असतो. हे योगदान देण्याकरिता आम्ही आत्मोन्नती केली पाहीजे. समाजातील दारिद्र्य, बेरोजगारी, शैक्षणिक दुरवस्था व सामाजिक मागासलेपणा दूर झाल्यासच हे स्वप्न वास्तवात उतरेल.

10. पालकांनी आपल्या पाल्यांना वय सहा ते चौदा वर्षांदरम्यानचे आपले अपत्य किंवा यथास्थिती पाल्य याला शिक्षणाच्या संधी देणे. सन २००२ मध्ये झालेल्या ८६ व्या घटना दुरुस्तीनुसार. या कर्तव्यांचे पालन झाले नाही, तर संविधानास अभिप्रेत असलेले सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य प्रस्थापित होणार नाही.

मूलभूत कर्तव्याची नोंद संविधानात चौथा प्रकरणातील 'राज्याचे मार्गदर्शक तत्वे' यानंतर कर्तव्याची यादी जोडण्यात आली आहे. यामुळे कर्तव्याचे स्वरूप केवळ सुचक, दर्शक आणि नैतिक झाले आहे. मूलभूत कर्तव्याला न्यायालयाचे मनावे तसे बळ लाभले नाही अशी टीका होत आहे. परंतु, राष्ट्राचे संरक्षण करणे, राष्ट्रगीताचा मान राखणे, बंधुभाव वाढीस लावणे ही कर्तव्य केवळ घटनेत लिहिले म्हणून करता येणार नाहीत ती उस्फुर्त प्रत्येकांनी मनातून करावी लागतात. म्हणून कर्तव्याची नोंद संविधानात कोठेच नसल्यामुळे भारतीय संविधानाला अपूर्णत्व आले होते. भारतीय संविधानाच्या चौथ्या प्रकरणातील तरतुदीमुळे ते अपूर्णत्व अंशतः दूर झाले आहे.

**संदर्भ:**

१. भारताचे शासन आणि राजकारण, डॉ.भा. ल. भोळे, पिंपळापुरे अंड को पब्लिशर्स, २०१८.

२. डॉ. सुधाकर जोशी, भारतीय शासन आणि राजकारण, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद, २०१५.

३. डॉ. दुर्गा दास बसू, भारतीय राज्यघटनेची ओळख, द बुक इज अ पब्लिकेशन ऑफ LexisNexis, २०१३.